नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २०२ Issue - 202 | वार सोमवार दि. ९ डिसेंबर २०२४ Blow- Monday Date 9 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## शेतकऱ्यांचा मोर्चा दिल्लीच्या दिशेने रवाना, सुरक्षा व्यवस्था वाढवली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : हमीभावासह इतर मागण्यांच्या पूर्ततेसाठी दिल्लीकडे निघालेल्या आंदोलक शेतकऱ्यांचा मोर्चा शंभू सीमेवर अडवून पोलिसांनी अश्रुधुराचा मारा केला होता. यामध्ये आठ शेतकरी जखमी झाले असून शेतकऱ्यांनी हा मोर्चा दिवसभरासाठी स्थगित केला होता. आता हा मोर्चा पुन्हा एकदा दिल्लीच्या दिशेने रवाना होणार आहे. किसान मजदूर मोर्चा आणि एसकेएम गटातील १०१ शेतकरी दुपारी दिल्लीकडे कूच करणार आहेत. यामुळे पंजाब-हरियाणा सीमेवर सुरक्षा वाढवण्यात आली आहे. त्यांना रोखण्याकरता बॅरिकेड्स लावण्यात आले आहेत.

शेतकरी नेते सर्वनसिंग पंढेर यांनी सांगितलं की, किमान आधारभूत किंमतीसाठी कायदेशीर हमीसह त्यांच्या चिंता आणि मागण्यांबाबत केंद्राकडून चर्चेसाठी कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे ८ डिसेंबर रोजी १०१ शेतकऱ्यांचा गट दिल्लीकडे पुन्हा मोर्चा काढणार आहे.

केंद्राने शेतकरी आणि मजुरांशी चर्चा न करण्याचा निर्णय घेतला आहे. ते आम्हला रोखण्यासाठी बळाचा वापर करत आहेत. कालच्याप्रमाणे आम्ही शांततेने आणि शिस्तीने दिल्लीत जाऊ. आम्ही १०१ शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ दुपारी १२ च्या सुमारास दिल्लीकडे पाठवण्याचा निर्णय घेतला आहे, असंही पंढेर म्हणाले.

केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी संसदेची दिशाभूल केल्याचाही आरोप पंढेर यांनी केला आहे. कृषीमंत्री संसदेची दिशाभूल करत आहेत. आम्ही एमएसपीवर कायदेशीर हमीची मागणी करत आहोत. पण मंत्री गप्प आहेत, असं पंढेर म्हणाले.

किसान मजदूर मोर्चा आणि ड्यच् गटातील १०१ शेतकरी दुपारी दिल्लीकडे कूच करणार आहेत. १०१ पैकी ८५ बीकेयू क्रांतीकारी युनिटमधील आहेत तर उर्वरित किसान मजदूर मोर्चा, बीकेयू बेहरामके, बीकेयू आझाद, किसान संघटना, राजस्थान युनिटमधील आहेत. तर, आंदोलकांमधील ज्येष्ठ नागरिक मोर्चाचे नेतृत्व करतील, असे शेतकरी नेते रणजितसिंग राजू यांनी सांगितले.

पंजाब-हरियाणा सीमेवरील शंभूपासून दिल्लीकडे मोर्चा नेण्यासाठी १०१ शेतकऱ्यांनी शुक्रवारी सकाळी तयारी केली. मात्र काही मीटर अंतरावरच त्यांना हरियाणा सुरक्षा दलांनी टाकलेल्या बॅरिकेडमुळे थांबावे लागले. बॅरिकेडपर्यंत आंदोलक पोहोचल्यानंतर पोलिसांनी त्यांच्यावर अश्रुधुराचा मारा केला आणि आंदोलकांना मागे जाण्यास भाग पाडले.

आंदोलक 'सत्नम वाहेगुरू'च्या घोषणा देत होते. अनेक शेतकऱ्यांनी बॅरिकेडचा पहिला अडथळा सहज दूर केला. पण त्यानंतरचे अडथळे त्यांना दूर करता आले नाहीत.

# मारकडवाडीसह सर्व ठिकाणी ईव्हीएम मतदानात पारदर्शकता

## जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांचे स्पष्टीकरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : माळशिरस विधानसभा मतदारसंघातील मारकडवाडी येथे ईव्हीएम यंत्रावर शंका उपस्थित करून मतपत्रिकेद्वारे चाचणी मतदान घेण्याची गावकऱ्यांनी केलेली तयारी आणि त्यास निवडणूक यंत्रणेने कायदेशीर कारवाईचा इशारा देत चाचणी मतदान रोखण्याच्या पार्श्वभूमीवर मारकडवाडीची चर्चा देशभर गाजत आहे. रविवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी स्वतः मारकडवाडीला भेट देऊन गावकऱ्यांशी साधलेल्या संवादानंतर जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सायंकाळी तातडीने एका पत्रकार परिषदेत ईव्हीएम यंत्र प्रणालीसह अन्य मुद्यांचे स्पष्ट शब्दात खंडन केले. कोणत्याही निवडणुकीचे मतदान घेण्याची अधिकार निवडणूक आयोगाला असून





अन्य कोणालाही नाही. मारकडवाडीत गावकऱ्यांनी स्वतःच्या समाधानासाठी चाचणी मतदान घेण्याची घेतलेली भूमिका पूर्णतः बेकायदेशीर होती. यातून समाजात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचे मत जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी व्यक्त केले.

माळशिरससह अन्य सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये ईव्हीएम प्रणाली द्वारे राबविलेली मतदान प्रक्रिया पूर्णतः पारदर्शक असून त्यात प्रत्येक टप्प्यावर संबंधित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना सामावून घेण्यात आले होते. प्रत्येक टप्प्यात याबाबत कोणीही आक्षेप घेतला नाही. परंतु, आता शेवटी असा आक्षेप घेऊन निवडणूक आयोगाच्या संदर्भात अविश्वासाचे वातावरण निर्माण करणे चुकीचे आहे, असे कुमार आशीर्वाद यांनी स्पष्ट केले.

ईव्हीएम प्रणाली राबविण्यात पूर्वी १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट दरम्यान पहिल्या स्तरावर ईव्हीएम यंत्र तपासणी केली गेली. तेव्हापासून ते मतमोजणीपर्यंतच्या सर्व टप्प्यांवर प्रक्रिया राबवताना साक्षीदार म्हणून संबंधित राजकीय पक्षांचे प्रतिनिधी हजर होते. ईव्हीएम यंत्र गोदामात स्ट्राँगरूममध्ये ठेवल्यानंतर मतमोजणी होईपर्यंत तेथे अहोरात्र सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत होते. सीसीटीव्ही फुटेज कोणत्याही क्षणी संबंधित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना पाहण्याची आणि योग्य खात्री करून घेण्याची मुभा होती. यात प्रत्येक स्तरावर पारदर्शकता असताना त्याबद्दल आता पुरावे न देताच आक्षेप घेतले जात आहेत. त्यामुळे निवडणूक यंत्रणाविषयी समाजात विनाकारण संभ्रम निर्माण केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

## विधानसभेच्या अध्यक्षपदी राहुल नार्वेकरांची निवड निश्चित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भाजपाचे आमदार राहुल नार्वेकर यांनी पुन्हा एकदा विधानसभा अध्यक्षपदाचा अर्ज भरला आहे. राहुल नार्वेकर ( ठर्हींश्र छ्रीुशज्ञरी ) यांनी आज सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यांची निवड बिनविरोध होणार हे निश्चित आहे कारण दुसऱ्या कुणीही या पदासाठी अर्ज भरलेला नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली

### विधासभेच्या अध्यक्षपदासाठी राहुल नार्वेकर यांनी केला अर्ज दाखल

विधानसभा अध्यक्षपादासाठी राहुल नार्वेकर ( ठर्हींश्र छ्रीुशज्ञरी ) यांनी अर्ज दाखल केला. आज दुपारी १२ वाजेपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत होती. तोपर्यंत राहुल नार्वेकर ( ठर्हींश्र छ्रीुशज्ञरी ) वगळता कुठलाही अर्ज आलेला नाही त्यामुळे त्यांची निवड ही निश्चित मानली जाते आहे.

महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचे मी आभार मानतो कारण या सगळ्यांनीच माझ्यावर विश्वास दाखवत मला महाराष्ट्र विधानसभेचा अध्यक्ष बनण्याची संधी दिलेली आहे. मी सगळ्या विधीमंडळ सहकाऱ्यांचेही मी आभार मानतो. आपल्या सर्वांना माहीत आहे की भाजपा ही पार्टी विथ डिफरन्स म्हणून मानली जाते. ज्यावेळी कुठल्याही पदाची जबाबदारी दिली जाते तेव्हा त्याचं वय किंवा त्याचा अनुभवच ग्राह्य धरला जात नाही तर त्याचं मेरिट पाहिलं जातं. युथला प्रमोट करण्याचं काम भाजपने सातत्याने केलं आहे. त्यामुळे ही निवड दिसून येते आहे. असं राहुल नार्वेकर ( ठर्हींश्र छ्रीुशज्ञरी ) म्हणाले. तसंच त्यांनी विरोधकांवरही टीका केली.

लोकशाहीवर विरोधकांचा विश्वास नाही म्हणूनच मरकडवाडीमध्ये आंदोलन करण्याचा प्रयत्न होतो आहे. आपण जर पाहिलं असेल तर लोकसभेला ईव्हीएमच्या माध्यमातूनच निवडणूक लढवण्यात आली. त्यावेळी कुणीही कसलीही तक्रार केली नाही. आता मनाविरुद्ध कौल आला की त्याचं खापर निवडणूक आयोगावर फोडायचं, हा केविलवाणा प्रकार सातत्याने विरोधक करत आहेत. मला वाटतं की येणाऱ्या काळात संविधानिक संस्थांवर असे आरोप न करता आपल्या जबाबदाऱ्या पार पाडायच्या आणि जनतेने दिलेला जो कौल आहे तो स्वीकारायला शिकलं पाहिजे. त्या जनमताचा अवमान होणं योग्य नाही. असंही नार्वेकर यांनी म्हटलं आहे.

### माझ्यावरही टीका झाली पण त्रुटी कुणीही दाखवू शकलं नाही : राहुल नार्वेकर


**माझ्यावरही या पूर्वी अनेक लोकांनी टीका केली. पण टीका करण्याशिवाय दुसरं काहीही त्यांनी केलं नाही. कारण मी दिलेला निकाल आहे त्यात त्रुटी दाखवण्यात कुणीही यशस्वी झालेलं नाही. उद्यापासून मी विधानसभा अध्यक्ष म्हणून काम करेन तेव्हा सगळ्या सहकाऱ्यांची साथ मला लाभेल आणि महाराष्ट्राच्या जनतेला मी न्याय देण्याचा प्रयत्न करेन निःपक्षपातीपणे सगळ्यांना समान न्याय मिळेल असं राहुल नार्वेकर म्हणाले आहेत. मला आज कुठल्याही प्रकारचं राजकीय वक्तव्य करायचं नाही. जनतेचा निर्णय हा अंतिम आहे. जनतेचा कुणावर विश्वास आहे ते जनमतातून दिसून आलं आहे असंही राहुल नार्वेकर यांनी स्पष्ट केलं.**

## तुळजाभवानी देवीच्या शाकंभरी नवरात्र महोत्सवास ७ जानेवारीपासून प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव/प्रतिनिधी : कुलस्वामीनी तुळजाभवानी देवीच्या शाकंभरी नवरात्र महोत्सवास ७ जानेवारी २०२५ पासून प्रारंभ होत आहे. तत्पूर्वी ३१ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी देवीच्या मंचकी निद्रेस प्रारंभ होत असून ७ जानेवारी रोजी पहाटे मूर्तीची सिंहासनावर प्रतिष्ठापना होऊन ब्राह्मणास अनुष्ठानाची वर्णी देण्यात येईल.

श्री तुळजाभवानी देवीचा शाकंभरी नवरात्र महोत्सव हा धाकटा दसरा म्हणून प्रसिद्ध आहे. विशेषतः कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यातील भाविक मोठ्या संख्येने देवीदर्शनासाठी शाकंभरी नवरात्र महोत्सव कालावधीत तुळजापुरात येतात. शारदीय नवरात्र महोत्सवाप्रमाणेच शाकंभरी नवरात्र महोत्सव काळातही तुळजापुरातील पुजारी बांधवांच्या घराघरात स्वच्छता केली जाते. त्याचबरोबर शाकंभरी नवरात्र महोत्सव काळात



उपवास केला जातो.

यावर्षी शाकंभरी नवरात्र महोत्सवात बुधवार, ८ जानेवारी रोजी देवीची नित्योपचार पूजा व त्यानंतर रथालंकार महापूजा मांडण्यात येणार आहे. गुरुवार, ९ जानेवारी रोजी देवीची नित्योपचार पूजा आणि त्यानंतर मुरली अलंकार महापूजा, शुक्रवार १० जानेवारी रोजी शेषशाही अलंकार महापूजा तर शनिवार ११ जानेवारी रोजी सकाळी जलयात्रा काढण्यात येणार आहे. या दिवशी देवीची भवानी तलवार अलंकार महापूजा मांडण्यात येणार आहे. रविवार १२ जानेवारी रोजी अग्निस्थापना, शतचंडी यज्ञ आणि देवीची महिषासूरमर्दिनी अलंकार महापूजा मांडण्यात येणार आहे. सोमवार, १३ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता घटोत्थापन आणि रात्री छबिना मिरवणूक व जोगवा कार्यक्रमाने नवरात्र महोत्सवातील मुख्य कार्यक्रमाची सांगता होईल. १४ जानेवारी रोजी दुपारी देवीची नित्योपचार पूजा, दुपारी अन्नदान, महाप्रसाद, रात्री छबिना मिरवणूक, संक्रांत पंचांग वाचन होणार असल्याची माहिती मंदिर संस्थानच्या वतीने देण्यात आली आहे. शाकंभरी नवरात्र उत्सव कालावधीत जिल्हा प्रशासनाच्या वतीने जय्यत तयारी सुरु करण्यात आली आहे. नवरात्र महोत्सव काळात भाविकांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेतली जात असून जिल्हा प्रशासनासह स्थानिक नगर परिषद व इतर विभागांमार्फत नियोजन केले जात आहे.

**अधिवेशनाच्या समाप्तीनंतर मंत्रिमंडळाचा विस्तार**

**महसूल, नगरविकास आणि सार्वजनिक बांधकाम खात्यांचा दिला पर्याय**

# गृहखाते देण्यास भाजपाचा नकार; शिवसेनेला 'या' खात्यांचा दिला पर्याय!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात सरकार स्थापन झाले असले तरीही खातेवाटप रखडलं आहे. कोणत्या पक्षाला किती आणि कोणतं खाते मिळणार याकडे अवघ्या राज्याचं लक्ष आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्रीपदावर अडून होते, परंतु त्यांना उपमुख्यमंत्रीपदी देण्यात आलं. तर, दुसरीकडे ते गृहखात्यावरही अडून आहेत, असं सांगितलं जातंय. दरम्यान, भाजपा गृहखातं सोडण्यास तयार नसल्याचं वृत्त आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. गृहखात्याच्या मोबदल्यात त्यांना महसूल, नगरविकास आणि सार्वजनिक बांधकाम खाते भाजपने देऊ केले आहेत. तर, अजित पवारांकडे आधीच वित्तखातं आहे.

भाजपामधील उच्चपदस्थ सूत्रांनी सांगितले की, भाजपाने आपला मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेला गृहमंत्रालय देऊ शकत नसल्याचे स्पष्ट केले आहे. ५ डिसेंबर रोजी, भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मुंबईतील आझाद मैदानावर मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यांच्याबरोबर शिंदे आणि पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले की, १६ डिसेंबरपासून नागपुरात सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार होणार आहे. ७ ते ९ डिसेंबर या तीन दिवसीय विशेष अधिवेशनाच्या समाप्तीनंतर मंत्रिमंडळाचा विस्तार केव्हाही होईल, असे संकेत भाजपाच्या सूत्रांनी दिले.



एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपद सोडल्याने त्यांना गृहखातं मिळावं अशी मागणी शिवसेनेकडून केली जात आहे. गुलाबराव पाटील, संजय शिरसाट, भरत गोगावले यांच्यासह अनेक शिवसेनेच्या नेत्यांनी शिंदे यांना गृहमंत्रिपद मिळावे, अशी आग्रही मागणी केली आहे. तर, २८८ पैकी १३२ जागा जिंकणारा सर्वात मोठा पक्ष असलेल्या भाजपाने गृहमंत्रालय आणि मुख्यमंत्रिपदावर आपला हक्क सांगितला आहे. शुक्रवारी माध्यमांना फडणवीस म्हणाले, केंद्रात भाजपाच्या नेतृत्वाखाली आमचे सरकार आहे. दिल्लीत केंद्रीय गृहमंत्रालय भाजपा (अमित शाह) कडे आहे. त्यामुळे एकाच पक्षाकडे गृहमंत्रिपद कायम ठेवल्याने समन्वय साधण्यास मदत होते.

भाजपाच्या नेत्याने सांगितले की, फडणवीस यांनी त्यांच्या पहिल्या कार्यकाळात (मुख्यमंत्री म्हणून) गृहखातेही सांभाळले आणि काही धाडसी सुधारणा केल्या. भाजपाकडे १८ ते २०, शिवसेनेकडे १२ ते १४ आणि राष्ट्रवादीकडे ९ ते ११ मंत्री असतील, असे सूत्रांचे म्हणणे आहे. महायुतीत ३० ते ३५ मंत्री असलेले मोठे मंत्रिमंडळ अपेक्षित आहे. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाची सर्वाधिक संख्या ४३ आहे. यामध्ये मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचाही समावेश आहे. नाव न सांगण्याच्या अटीवरून एका भाजपा नेत्याने इंडियन एक्स्प्रेसला सांगितले, तीन पक्षांची युती राज्यात अडीच वर्षांपासून राज्य करत आहे. शिंदे ते फडणवीस मुख्यमंत्री बदल सोडला तर इतर बहुतांश फेरबदल किरकोळ असतील. मंत्रिमंडळाची रचना तशीच राहण्याची शक्यता आहे, प्रत्येक पक्षाने त्यांचे विद्यमान पोर्टफोलिओ मुख्यत्वे राखून ठेवले आहेत मात्र, काही विभागांबाबत काही वाटाघाटी होऊ शकतात. घराव्यतिरिक्त ऊर्जा, जलसंपदा, आदिवासी कल्याण, गृहनिर्माण, ग्रामीण विकास, ओबीसी कल्याण आणि उच्च आणि तांत्रिक शिक्षण विभाग राखण्याचे भाजपचे उद्दिष्ट आहे. यापूर्वीच्या सरकारमध्ये महसूल आणि सार्वजनिक बांधकाम विभागही भाजपाकडे होते. शिवसेनेने नगरविकास कायम ठेवल्यास महसूल/सार्वजनिक बांधकाम खाते भाजपाकडे परत येईल. मात्र, शिवसेनेला उद्योग, शालेय शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), अल्पसंख्याकांचा विकास आणि वक्फ बोर्ड विकास, मराठी भाषा या ही खाती देण्यात येण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अर्थ, सहकार, कृषी, आरोग्य आणि उच्च शिक्षण, तसेच अन्न व औषध प्रशासन आणि महिला व बालकल्याण ही प्रमुख मंत्रालये मिळण्याची शक्यता आहे.

## संपादकीय....

### अविश्वासाचा वातावरण

ईव्हीएम प्रणाली राबविण्यात पूर्वी १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट दरम्यान पहिल्या स्तरावर ईव्हीएम यंत्र तपासणी केली गेली. तेव्हापासून ते मतमोजणीपर्यंतच्या सर्व टप्प्यांवर प्रक्रिया राबवताना साक्षीदार म्हणून संबंधित राजकीय पक्षांचे प्रतिनिधी हजर होते. ईव्हीएम यंत्र गोदामात स्ट्राँगरूममध्ये ठेवल्यानंतर मतमोजणी होईपर्यंत तेथे अहोरात्र सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत होते. सीसीटीव्ही फुटेज कोणत्याही क्षणी संबंधित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना पाहण्याची आणि योग्य खात्री करून घेण्याची मुभा होती. यात प्रत्येक स्तरावर पारदर्शकता असताना त्याबद्दल आता पुरावे न देताच आक्षेप घेतले जात आहेत. त्यामुळे निवडणूक यंत्रणाविषयी समाजात विनाकारण संभ्रम निर्माण केले जात असल्याचे नुकतेच जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले. माळशिरससह अन्य सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये ईव्हीएम प्रणाली द्वारे राबविलेली मतदान प्रक्रिया पूर्णतः पारदर्शक असून त्यात प्रत्येक टप्प्यावर संबंधित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना सामावून घेण्यात आले होते. प्रत्येक टप्प्यात याबाबत कोणीही आक्षेप घेतला नाही. परंतु, आता शेवटी असा आक्षेप घेऊन निवडणूक आयोगाच्या संदर्भात अविश्वासाचे वातावरण निर्माण करणे चुकीचे आहे.

## विविध उपक्रम राबवून महापरिनिर्वाणदिनी महामानवास एकजूट तर्फे अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ( राहुल बनसोडे ) ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध उपक्रम राबवून एकजूट लेणी अभ्यास प्रचारक समुह महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्यावतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आला.विविध उपक्रम मध्ये भारतातल्या बौद्ध लेणी बाबत आणि सम्राट अशोककालीन धम्म लिपी बाबत जनजागृती मोहीम राबविण्यात आली. ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनाच्या मध्यरात्री एकजूटच्या महिला समूहाकडून महामानवास पुष्पहार अर्पण करीत साामूहिक रित्या अभिवादन करण्यात आले.शाहीर वेदांत मोरे यांनी महामानवास आपल्या शाहिरी शैलीतून अभिवादन केले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दादुस डोळस यांनी आपल मनोगत व्यक्त करताना म्हटले की,महामानवांचे आचार, विचार,आपण आत्मसात केले पाहिजे.तसेच आपले प्राचीन वारसा



असलेल्या सम्राट अशोक निर्मित बुद्ध लेणी च्या संवर्धन करण्यासाठी तरुण वर्ग पुढे येऊन आपला वारसा जपले पाहिजेत.बुद्ध लेणी चा प्रचार जनसामान्य लोकांपर्यंत पोहचवता आला पाहिजे.असे वक्तव्य दैनिक यश सिद्धी न्युज शी बोलताना त्यांनी केली.सम्राट अशोककालीन धम्म लिपीची ओळख व बुद्ध लेणी बाबत येणाऱ्या भीम अनुयायींना एकजुटच्या टीम कडून माहिती देण्यात येत होते. लाखोंच्या संख्येने चैत्यभूमिवर येणाऱ्या भीम अनुयायीं ना अनेक गैरसोयीचा सामना करावा लागतो.येणाऱ्या भीम अनुयायी ना एकजूट समुहा कडून दिनांक ४ तारखेपासून दादरच्या शिवाजी पार्क मैदानावर चहा,बिस्किट्स,फळे वाटप करण्यात येत होते.हे उपक्रम यशस्वी करण्यासाठी बबन ओव्हाळ,लाटकर सर,ऍड खंडेश बगाटे, प्रफुल्ल पुरळकर, शुभम डोळस, भूमिका डोळस, अरविंद सावंत, सुरेश माने, आदींनी अथक परिश्रम घेतले.धम्मदान,श्रमदान करणारे उपासक उपासीकांचे एकजूट समुहा तर्फे आभार व्यक्त करण्यात आला.

## टिटवाळा येथील रिजन्सी गृह संकुलामध्ये भटक्या कुत्र्यांचा महिलेवर जीवघेणा हल्ला; महिला गंभीर जखमी, परिसरातील नागरिक संतप्त

टिटवाळा (कल्याण ) /विजय घनघाव : टिटवाळा येथील रिजन्सी गृह संकुल परिसरातील इमारत क्र. ८ आणि ९ च्या परिसरात काल (६ डिसेंबर )रात्रीच्या सुमारास भटक्या कुत्र्यांनी एका महिलेवर जीवघेणा हल्ला केला आहे.. ३/४ कुत्र्यांनी सदर महिलेवर केलेल्या या हल्लया मध्ये महिला ही गंभीर जखमी झाली आहे. तीला पुढील उपचारासाठी गोवेली येथे प्राथमिक उपचार केंद्रामध्ये दाखल केले आहे. सदर महिलेची ओळख पटलेली नाही. परिणामी सदर च्या घटनेने रिजन्सी गृह संकुल परिसरातील समस्त नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या घटनेनंतर कल्याण डोंबिवली महापालिकेकडून श्वान पथक सदर घटना स्थळी पोहचले. परंतु त्यांना केवळ १/२ कुत्रे पकडण्यात यश आले आहे. या घटनेने परिसरातील नागरिकांकडून संतप्त आणि संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत. रिजन्सी गृह संकुल फेडरेशन चे अध्यक्ष दिपक कांबळे यांनी या घटनेबाबत प्रतिक्रिया देताना म्हटलं आहे की परिसरात भटक्या कुत्र्यांना जे लोक खायला देतात त्यामुळे भटके कुत्र्यांची संख्या वाढत आहे... अशा घटनाना हे लोक तितकेच जबाबदार आहेत. तसेच आम्ही सदोदित पणे महापालिकेच्या श्वान पथकाच्या सान्निध्यात आहोत.. परिसरात शक्य ते कुत्रे पकडून, त्यांना शक्य त्या लसी देऊन इतर लांब ठिकाणी पुन्हा सोडून द्यावे अशी आमची मागणी असल्याचे म्हटलं आहे. तसेच संकुला मधील नागरिकांनी आपल्या लहान मुलांना एकट्याला खेळण्यासाठी सोडून देऊ नये, लहान मुलांसोबत जातीने हजर राहून अशा घटनांना काही प्रमाणात का होईना आळा घालण्यासाठी सहकार्य केले पाहिजे.

**रिजन्सी गृह संकुला मधील निवडक सदस्यांच्या प्रतिक्रिया...**

रिजन्सी वासियांना होणारा कुत्र्यांचा त्रास हा खूप वेळा आपण अनुभवलेला आहे. आणि त्यावर उपाय करण्याचा देखील प्रयत्न झाले, पण आज झालेल्या घटनेवरून ते अपुरे पडत आहेत असं वाटत आहे. हृदय पिळवटून टाकणारी ही घटना आहे...असा दुर्दैवी प्रसंग भविष्यात आपल्या कुटुंबातील व्यक्तींवर देखील ओढावू शकतो.

फेडरेशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांना हात जोडून कळकळीची विनंती आहे की, कृपया आपण याची गांभीर्याने दखल घेऊन त्वरित नविन सिक्युरिटी ची वियुक्ती करावी व सर्व रिजन्सी वासियांना सुरक्षीत करावं. **– कैलास जाधव**

रिजन्सी गृह संकुला मधील अतिशय भयावह घटना आहे. यापूर्वी ही बऱ्याच लोकांना, मुलांना कुत्र्यांनी चावा घेतल्याचा घटना घडल्यात. पण ही घटना क्रूर हल्ला असल्याची आहे. प्राणी सरंक्षण कायदा विचारात घेऊन या बाबत ठोस काही उपाययोजना होणे अतिशय आवश्यक झाले आहे. भविष्यात अशा घटना घडू नये याची खबदारी घेणे खूप गरजेचे आहे. काही लोक भटक्या कुत्र्यांना अन्न देतात, ज्यामुळे त्यांचा वावर सोसायटीत वाढतो. याबाबतीत ही विचार व्हावा. **– ऍड. शेखर वाकोडे ( रिजन्सी गृह संकुल फेडरेशन सदस्य )**

भटक्या कुत्र्यांना खाऊ घालणारे हे स्ट्रीट डॉग प्रेमी काहीही बोलणार नाहीत. यावेळेपुरतं अंडरग्राउंड ! खरं तर ज्यांनी बिल्डिंगच्या आजूबाजूला कुत्रे पाळून ठेवली आहेत, अश्या लोकांनाच ह्या घटनेचा जबाबदार म्हणून गृहीत समजले पाहिजे. जिवंत माणसाची हत्या करून व कुत्र्यांची सेवा करणाऱ्या लोकांनी थोडा विचार करावा. **– दिपक तोरणे**

सदर घटनेचे गांभीर्य केवळ ठराविक इमारती करता न लक्षात घेता पूर्ण रिजन्सी गृह संकुल परिसरात, आणि कोणत्याही प्रकारची राजकीय भूमिका न घेता सर्वांच्या हितासाठी भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी किंवा तत्सम काही उपाय योजना करण्यासाठी समस्त नागरिकांनी पुढे सरसावले पाहिजे... – **विनोद इंगळे.**

## इंग्लिश मीडियम स्कूल निफाड येथे विज्ञानप्रदर्शन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : इंग्लिश मीडियम स्कूल निफाड येथे दि.५ डिसेंबर २०२४ रोजी स.११ ते दु.२ या वेळेत विज्ञान प्रदर्शन सोहळा संपन्न करण्यात आला असून या कार्यक्रमासाठी संस्थेचे विश्वस्त, उगावकर आप्पा. कार्यकारी विश्वस्त व्यवहारे , सचिव रतन वडघुले .राठी , सोनी , वाघावकर, कुयटे, राऊत तात्या, विश्वास नाना कराड, नांदे प्राचार्या सौ. सानप ,विज्ञान विभागाचे सर्व शिक्षक यांच्या उपस्थितीत विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन व्यवहारे सर यांच्या हस्ते करण्यात आले.




विज्ञान प्रदर्शनात भौतिकशास्त्र ,रसायनशास्त्र जीवशास्त्र, तसेच नवनवीन पर्यावरणीय संकल्पना, व होणाऱ्या पर्यावरणाचा ऱ्हास व त्यावर उपाययोजनात्मक प्रतिकृती ,तक्ते ,तसेच मॉडेल इत्यादींचा विज्ञान प्रदर्शनात समावेश विद्यार्थ्यांनी केला होता... विद्यालयाच्या इयत्ता तिसरी ते नववी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी या विज्ञान प्रदर्शनात आपला सहभाग नोंदविला होता.

विज्ञान व गणित विभागात एकूण ७५ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला होता तसेच इतर विषयात उत्सुक असलेल्या विद्यार्थ्यांनी मराठी ,इंग्रजी व हिंदी या विषयात देखील नवनवीन संकल्पना व प्रतिकृती तयार करून प्रदर्शनात मांडण्यात आल्या होत्या. परीक्षक म्हणून लाभलेले विज्ञान विभाग प्रमुख ससाने ,सौ.पटेल , सौ राखुंडे यांनी काम बघितले, प्रदर्शनात उत्कृष्ट प्रतिकृती तयार करणारे विजेते विद्यार्थ्यां *प्रथम गट इ.३री ते ४थी १. प्रथम –अनुज पंडित, सम्यक सुरळीकर. २. द्वितीय _देवांश खडताळे. ३. तृतीयअथर्व नितीन वाघ. द्वितीय गट ५वी ते ७वी* १. प्रथम_आराध्या ढोमसे, आराध्या धारराव. २. द्वितीय_दर्शन शिंदे. ३. तृतीय_आराध्या कुंदे. *तृतीय गट८वी ते ९वी १. प्रथम –अस्मिता शिंदे. २. द्वितीय –सोहम विजय शिंदे. ३. तृतीय–ईश्वरी अमोल जेउघाले. यांना विजेते घोषित करण्यात आले. यावेळी पालक वर्ग,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री.माणकेश्वर वाचनालय निफाड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील श्री.माणकेश्वर वाचनालय येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले . त्यांच्या प्रतिमेचे पुजन वाचनालय सभागृहात निफाड ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच दिलीप कापसे यांच्या हस्ते करण्यात आले.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष मधुकर शेलार यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. बाळासाहेब कापसे यांनी केले. या प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष श्री.मधुकर शेलार, चिटणीस बाळासाहेब कापसे, उपाध्यक्ष डॉ मेघा जंगम,हिशोब तपासनीस श्री.दत्ताकाका उगावकर ,संचालक श्री सुहास सुरळीकर नईम पठाण, सुनील चिखले, वाचक शिवराम सैंद्रे , चंद्रभान भोसले, वाचनालयाचे कर्मचारी नितीन बनसोडे, नंदकुमार पुंड, विद्या बंद्रे, अनिता इस्ते, आदी उपस्थित होते.

## गरोदर माता व हेल्थ मानसिक शिबीर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/बोडगांव देवी : अर्जुनी मोरगांव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र चान्ना येथे दि.६ डिसेंबर रोजी गरोदर मातांचा शिबीर घेण्यात आला येथे अतिजोखिम माता शोधून संदर्भित करण्यात आले.

यावेळी अतिजोखिम मातांना योग्य तपासणी, सल्ला व औषधउपचार डॉ.मनोज डोंगरवार (बालरोगतज्ञ) आणि डॉ.पल्लवी नाफडे (स्त्रीरोग तज्ज्ञ) यांनी दिला आहे.

याठिकाणी सर्वप्रथम ६ डिसेंबर महपरिनिर्वाण दिनानिमित्ताने भारतीय राज्यघटनेचे आदर्श शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी



डॉ. श्वेता कुलकर्णी व प्रा.आ.केंद्रातील आदी आरोग्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सर्व गरोदर मातांची बायओड टेस्टिंग जसे बी ग्रुप, सिकलसेल, थायसेमीया, हायपाटीस बी, सिप्टी, सिफोलीस, हाईमोग्लोबिन, थायरॉईड, सुगर, रक्तदाब, मूत्रचाचणी, पोटाचा घेर, बाळाचे ठोके या सर्व चाचण्या फेटाल डोप्पलर या मशीनद्वारे विविध प्रकारच्या आजारांची तपासणी व डिजिटल वजन काट्याने वजन मोजण्यात आले त्याच बरोबर सोनोग्रापीची रिपोर्ट तपासण्यात आली व कमीत कमी तीन सोनोग्राफी झाले किंवा नाही आणि व्हीनस ब्लड सॅम्पलिंग ने हाईमोग्लोबिन झाले किंवा नाही याची खात्री करण्यात आली ब्लड ट्रान्सफिसनसाठी सिकलसेल गरोदर मातेला संदर्भित करण्यात आले

प्राथमिक आरोग्य केंद्र चान्ना याठिकाणी के.टी.एस रुग्णालय गोंदिया वरून मानसिक हेल्थ टीम आली आणि त्यामध्ये नवीन रुग्णांनी २० रुग्णांनी मानसिक हेल्थ शिबीराचा लाभ घेतला असून त्याचवेळी औषधउपचार सुद्धा देण्यात आले. यावेळी गरोदर आणि स्तनदा माता यांना योगासनाचे धडे देऊन जेवण देण्यात आले. पुढील शिबीराची ता.२० डिसेंबर असून पुढील तारखेला संबंधित उपकेंद्राचे लाभार्थी यांना ऍम्ब्युलन्सने प्राथमिक आरोग्य केंद्र चान्ना याठिकाणी नेवून देण्यात येईल अशी माहिती प्रा.आ.केंद्र चान्ना येथील संबंधित आरोग्य अधिकाऱ्यांच्या या माध्यमातून कळविण्यात येते आहे.

## पंचशील विद्यालय बाराभाटी येथे महापरिनिर्वाण दिनी महामानवास अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बोडगांव देवी/प्रतिनिधी : अर्जुनी मोरगांव तालुक्यातील पंचशील विद्यालय बाराभाटी येथे दिनांक ६ डिसेंबर रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, दलितांचे कैवारी, मूकनायक, भारतरत्न, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. प्रथमत: शाळेचे मुख्याध्यापक व्ही.एम चव्हाण, ज्येष्ठ शिक्षक डी एच मेश्राम यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला दीप प्रज्वलन व पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी प्रतिनिधी यांनी पुष्प वाहून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.




सहाय्यक शिक्षिका डी एस भैसारे यांच्या मार्गदर्शनाखाली सामूहिक त्रिशरण च्या माध्यमातून बाबासाहेबांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर बाबासाहेब व संविधान या विषयावर आधारित भाषण, गीत गायन, एकपात्री नाट्य व प्रश्नमंजुषा स्पर्धेला सुरुवात झाली. स्पर्धेत शाळेतील तब्बल ६० ते ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रत्येक स्पर्धक बाबासाहेबांचे जीवन कार्य, समाजासाठी केलेले संघर्ष व त्याग तसेच संविधानाचे महत्त्व आपल्या वाणीतून उत्कृष्टपणे मांडत परीक्षकांचे लक्ष वेधून घेत होते. देवयानी किरसान या विद्यार्थिनीने तर बाबासाहेब आंबेडकर या एक अन एक अक्षराचा अर्थ आपल्या भाषणातून मांडले.

तर वर्ग सातवी ची विद्यार्थिनी आराध्या रंगारी हिने एकपात्री नाट्य सादर करीत बाबासाहेबांच्या समाजकार्यात रमाबाईंनी दिलेली साथ व संघर्ष उत्कृष्टपणे मांडत सर्वांना रमाबाईची महती पटवून दिली. तसेच बऱ्याच स्पर्धकांनी गीत गायनाच्या माध्यमातून संगीतमय व भावनिक वातावरण तयार करीत सर्वांना मंत्रमुग्ध केले. स्पर्धकाबरोबर सांस्कृतिक प्रमुख टि. के भेंडारकर यांनी हार्मोनियमच्या सहाय्याने सुमधुर गोड अशा आवाजानी विद्यार्थ्यांची मन जिंकली.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीच्या नियोजनाकरिता आलेले पंचायत समिती अर्जुनी मोरगावचे गटशिक्षणाधिकारी अनिल चव्हाण व केंद्रप्रमुख नाजुकराम लंजे यांनी बाबासाहेबांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहून आपल्या भाषणाद्वारे विद्यार्थ्यांना शिक्षण व आई-वडिलांचे महत्त्व पटवून दिले. शाळेतील मुख्याध्यापक व्ही एम चव्हाण, सहाय्यक शिक्षक डी एच मेश्राम व आर डी कोल्हारे यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना बाबासाहेबांचे विचार पटवून देत मोलाचे मार्गदर्शन केले. प्रेक्षक म्हणून सर्व विद्यार्थी कानाचे डोळे करून ऐकत होते. सहाय्यक शिक्षक एस सी पुस्तोडे यांनी प्रश्नमंजुषा ही स्पर्धा उत्कृष्ट, नियोजनबद्ध, मनोरंजनात्मक पद्धतीने संचालन करीत यशस्वीरीत्या पार पाडली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन एन.एस नंदागवळी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहाय्यक शिक्षक जे.एम दोनाडकर व इतर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## अनंत चैतन्य प्रशालेत महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : आधुनिक भारताचे निर्माते,थोर न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ,राजकारणी, तत्वज्ञ आणि समाजसुधारक, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूर येथे प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी इ. ८वी तील विद्यार्थिनी कु. श्रृती बाळशंकर हिने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर प्रशालेचे जेष्ठ शिक्षक श्री. शहाजी माने सर यांनी समाजातील विषमता नष्ट करून समतेचे बीज रोवण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनाचा सखोल परिचय आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून करून देत बाबासाहेबाप्रमाणे प्रज्ञा, शील,



करुणा या बुद्ध त्रिरत्नांचा स्वीकार करून जीवनात प्रगती साधण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन सौ. स्वप्नाली जमदाडे मॅडम यांनी केले तर आभार सौ. मल्लम्मा चप्पळगाव मॅडम यांनी मानले. यावेळी पर्यवेक्षक श्री.ज्ञानदेव शिंदे,सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. अप्पासाहेब काळे, जेष्ठ शिक्षक श्री. सरदार मत्तेखाने,श्री.धनंजय जोजन,प्रा. काशीनाथ पाटील, श्री. अब्दुल अझीझ मुल्ला उपस्थित होते. या आजच्या थोर विचारवंत, अस्पृश्य समाजाची अस्मिता जागवणारे पहिले महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रशालेतील कार्यक्रमाविषयी संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते मा. सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसूती, सी. ई. ओ. सौ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी समाधान व्यक्त केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### अर्धवट बांधकाम करून ठेकेदारांनी केली आर्थिक फसवणूक

सोलापूर, (प्रतिनिधी) : बांधकाम करण्यासाठी ५ लाख ५४ हजार रुपये घेऊन बांधकाम पूर्ण न करता अर्धवट करून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी ठेकेदार व त्याच्या पत्नीवर गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेच्या हकीकत अशी कि, फिर्यादी शांतीकुमार नागटिळक (रा.बुधवार पेठ सम्राट चौक,सोलापूर) यांच्या राहत्या घरी जागेचे बांधकाम ४ लाख ५० हजार रुपये मध्ये करून देण्याकरिता ठेकेदार राजकुमार भीमाशंकर उडचण यांनी कबुली देत २०१९ साली करार पत्र करत १ लाख रुपये घेऊन बांधकाम सुरू केले.त्यानंतर फिर्यादीने ठेकेदारास वेळोवेळी जवळपास ५ लाख ५४ हजार अशी रक्कम दिली. चार-पाच वर्षे झाले तरी बांधकाम पूर्ण झाले नाही.त्यानंतर ठेकेदार यांनी घराचे अर्धवट बांधकाम करून सोडून गेला. याचा जाब विचारला असता,ठेकेदार व त्याच्या पत्नीने तुमच्या बांधकामाचे काम होणार नाही. थोड्या दिवसांनी तुमच्या हिशोब करून तुमचे पैसे परत करू.आमच्या घरी यावयाचे नाही. असे म्हणून शिवीगाळ व दमदाटी केली. याप्रकरणी ठेकेदार राजकुमार भीमाशंकर उडचण व पत्नी वर्षा राजकुमार उडचण (दोघे रा.निराळे वस्ती, सोलापूर) यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला.या घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव हे करित आहे.

### मागील भांडणावरून डोक्यात घातला कोयता

सोलापूर, (प्रतिनिधी) : मागील झालेल्या भांडणाच्या कारणावरून शिवीगाळ करत लोखंडी कोयता तरुणाच्या डोक्यात मारून जखमी केल्याची घटना १ डिसेंबर रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास राजूजी नगर येथे घडली. याप्रकरणी श्रीदत्त संतोष गुरव (वय-१९,रा.बुवा गल्ली,भूषण नगर) याने सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्याच्या फिर्यादीवरून नागेश परशुराम सोनेकर (रा.माहित नाही) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी श्रीदत्त गुरव हा कामावरून घरी येत असताना नागेश याने श्रीदत्त याची मोटारसायकल अडवली व जुन्या भांड्याच्या कारणावरून शिवीगाळ करून तुला जास्त माज आला आहे का? आमच्याशी भांडण करतो असे म्हणून त्याच्या हातातील लोखंडी कोयत्याने श्रीदत्तच्या डोक्यात मारून जखमी केले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस नाईक जाधव हे करीत आहेत.

# माढा विधानसभेतील जनतेचे आशीर्वाद घेत विधानभवनासमोर नतमस्तक

## विधान भवनात आ. अभिजीत पाटील यांचा प्रवेश





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा मतदारसंघातील जनतेचे आशीर्वाद मला लाभले त्यामुळेच मी इथपर्यंत पोहोचलो असे म्हणतच त्यांनी विना विधान भवनामध्ये शनिवार दिनांक सात रोजी विधान भवनामध्ये प्रवेश केला.

विधान भवनाच्या पहिल्या पायरीवरती नतमस्तक झाली त्यावेळेस त्यांना माढा मतदारसंघातील जनतेचे म्हणून मला आठवले अशी त्यांनी बोलताना आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

विधानसभेची निवडणूक २० नोव्हेंबरला झाली व २३ नोव्हेंबरला मतमोजणी मोहन निकाल हाती आला व माढा तालुक्यातील लढतीकडे सोलापूर जिल्ह्याचे नेते महाराष्ट्र राज्याचे लक्ष लागलेले होते.

निर्णय लढतीमध्ये आम्ही अभिजीत पाटलांना माढा मतदार संघातील जनतेने तीस हजार मताधिक्याने मोठा दणदणीत विजय संपादन केला आहे.

काही दिवसातच महायुतीचे सरकार स्थापन झाली. सरकार स्थापनेनंतर शनिवारी दिनांक सात रोजी सरकारने विशेष अधिवेशन बोलावली या अधिवेशनामध्ये उपस्थित राहण्यासाठी आमदारा अभी पाटीलकी यांनी आपली उपस्थिती हजेरी लावली त्यांनी मोठ्या थाटात विधानभवनात प्रवेश केला.

विधान भवन्याच्या पहिल्या पायरीवर नतमस्तक होत मतदार संघातील जनतेची आठवण काढत विधान भवनामध्ये त्यांनी प्रवेश केला.

माढा मतदारसंघातील गेले तीस वर्ष म्हणा मतदारसंघाचा कारभारी सत्ता उलटून टाकण्याचे काम काम केले. व म्हाडा तालुक्यात नवीन इतिहास घडवून आणला. अभिजीत पाटील हे लोकप्रिय विकास प्रिय असं व्यक्तिमत्व आहे थोड्या दिवसातील माढ्याचा सर्वांगीण विकास करून दाखवीन आणि विकासासाठी निधी खेचून आणण्याचे त्यांनी अभिवचन दिले.

निवडणूक लढवून आमदार व्हायच्या हा त्यांचा आत्मविश्वास होता व हत्यांनी पूर्ण केला आहे. त्यांनी आणि विधान भवनामध्ये पहिल्या दिवशीच्या प्रवेशाने जनतेच्या पाठबळामुळे मी इथपर्यंत येऊ शकलो अशी त्यांनी अशा व्यक्त केली.

## श्री दत्त जयंती उत्सव निमित्त लोह्यात कार्यक्रमाचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : शहरातील देऊळ गल्ली येथे श्री दत्त जयंती उत्सवाच्या निमित्त आठ दिवस कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून या कार्यक्रमासाठी जय तयारी करण्यात आली आहे.

९ डिसेंबर २०२४ रोजी या श्रीदत्त जयंती उत्सवास प्रारंभ होणार असून या कीर्तनाचा लाभ मोठ्या संख्येने घ्यावे असे आवाहन ह भ प गुरुवर्य श्री लक्ष्मीकांत प्रभू महाराज लोहेकर श्री दत्त संस्थान देवालय लोहा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

९ डिसेंबर २०२४ पासून प्रारंभ होणाऱ्या श्रीदत्त उत्सवाच्या निमित्त-ाने कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली आहे. दररोज सकाळी चार ते पाच काकड आरती. सकाळी पाच ते सात श्री दत्त मूर्तीस अभिषेक सकाळी साडेआठ ते साडेनऊ गीता पारायण दुपारी चार ते पाच ज्ञानेश्वरी पारायण सायंकाळी सहा ते सात हरिपाठ धुपारती अशा पद्धतीने रूपरेषा ठरविण्यात आली असून कीर्तनाचे कार्यक्रम पुढील प्रमाणे आहेत.

९ डिसेंबर २०२४ रोजी रात्री साडेआठ ते साडेदहा पर्यंत ह भ प आत्माराम महाराज रायवाडीकर यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम. १० डिसेंबर २०२४ रोजी ह भ प भालेराव गुरुजी यांचे कीर्तन ११ डिसेंबर २०२४ रोजी ह भ प सदाशिव महार-ाज मस्कीकर १२ डिसेंबर ह भ प चिंतामणी महाराज गंगाखेडकर १३ डिसेंबर माधव महाराज मिसाळ १४ डिसेंबर रोजी ह भ प लक्ष्मीकांत प्रभू महाराज लोहेकर तर सायंकाळी ह भ प भागवताचार्य दीपक गुरु पांगरेकर १५ १२ २०२४ ह भ प तुकाराम महाराज चव्हाण एकनाथ महाराज आळंदीकर १६ डिसेंबर २०२४ रोजी ह भ प लक्ष्मीकांत प्रभू महाराज लोहेकर यांचे काल्याचे किर्तन होईल.

सदरील दत्त जयंती उत्सवानिमित्त कीर्तनाचे कार्यक्रम सद्गुरु धाम श्री दत्त संस्थान देऊळ गल्ली लोहा येथे आयोजित करण्यात आला असून भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने या कीर्तनाचा लाभ घेऊन श्री दत्त जयंती उत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन श्री दत्त जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

## शिवसेनेचे नेते सागर पाटील यांच्या गाडीवर हल्ला; शेकाप नेते डॉक्टर अनिकेत देशमुख यांच्याकडून निषेध




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शिवसेनेचे नेते सागर पाटील यांच्या गाडीवर हल्ला झालेला ही घटना निषेधार्थ असून या घटनेची सखोल चौकशी करावी अशी मागणी सांगोला पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक भीमराव खंणटाळे यांच्याकडे शेतकरी कामगार संघटनेचे नेते आ. डॉक्टर अनिकेत देशमुख यांनी पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळे यांच्याशी संपर्क साधला.

यावेळी याबाबत माहिती घेतली असता पोलीस स्टेशनला याबाबत कोणत्याही गुन्हा दाखल झालेला नाही असे सांगण्यात आले असून संघटनेचे सखोल चौकशी करण्याची मागणी शेकापचे सकाळचे नेते अनिकेत देशमुख यांनी केली आहे.

सांगोला तालुक्यामध्ये स्वर्गीय आबासाहेबांनी ज्या पद्धतीने सुसंकृत राजकारण व समाजकारण केले होते त्याच पद्धतीने येणाऱ्या काळात सुद्धा त्याच पद्धतीने कामकाज करण्यात येणार असून गुन्हेगारी प्रवृत्तीचा थरार देण्यात येणार नाही.

त्यामुळे अशा हल्लयांना शेतकरी कामगार पक्ष कदापि पाठीशी घालणार नसून या घटनेचा मी व्यक्तीच्या निषेध करून करत असून घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी डॉक्टर अनिकेत देशमुख यांनी पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळे त्यांच्याकडे केली आहे.

# भिगवणच्या अंजली इंण्डेन गॅस एजन्सी कडून ग्राहकांच्या टाकीतील गॅसची चोरी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे : भिगवण ता.इंदापूर येथील अंजली इंण्डेन गॅस एजन्सी कडून होतेय दिवसाढवळ्या टाकीतील गँसची चोरी भरलेल्या गॅस टाकीतून मोकळ्या टाकीत पाईपच्या साह्याने तीन ते चार किलो गॅस काढून घेतला जातो आणि टाकीचे सील बंद केले जाते.

तीच गँस काढून घेतलेली टाकी ग्राहकांना मूळ रकमेला विकली जाते, असा हा दिवसाढवळ्या चोरीचा धंदा अंजली इंण्डेन गॅस एजन्सी करत असून ग्राहकांना लुटण्याचे काम करीत आहे.असाच प्रकार दिनांक २९/११/२०२४ रोजी घडला असून हा चोरीचा प्रकार गुप्त बातमीदारामार्फत ठाणे येथील पत्रकार रिता यादव यांना समजला आणि त्यांनी भिगवण पो-लीस स्टेशन यांच्याशी संपर्क साधून या गँस माफियांचा काळा बाजार उघड केला.

घडलेली हकीकत अशी की दि.(२९) रोजी अंजली इण्डेन गॅस एजन्सीचे कामगार आरोपी नं.१) व २) यांनी आपापसात संगनमत करुन इण्डेन गॅस कंपनीचे घरगुती गॅस सिलेंडर मधील ज्वलनशील गॅस हा १) महिंदा बोलेरो पिकअप क्र.चक १२ FD १५९२, २) महिंद्रा बोलेरो पिकअप क्र.चक ४२ इऋ ३४५८, ३) महिंद्रा बोलेरो पिकअप चक ४२ इख ३४५९, अशा तिन वाहनामध्ये भरलेल्या ४७ सिलेंडरच्या टाकीमधून मोकळ्या सिलेंडरच्या टाकीमध्ये एका लोखड़ी पाईपच्या साहयाने गॅस भरुन चोरी करीत असताना पत्रकार आणि पोलीस यांना मिळुन आले म्हणून त्यांचेवरती भिगवण पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३९८/२०२४ BNS ३०३ (२),२८७,२८८,१२५.३(५) या प्रकारे

फिर्यादी- सौ. रिता महेंद्र यादव, वय ४० वर्षे,व्यवसाय पत्रकार से कल्याण पुर्व, चक्की नाका शास्त्रीनगर, सिताबाई चाळ, रुगम हाजीमलंग रोड जि.ठाणे यांनी गुन्हा दाखल केला आहे.यावेळी आर-ोपी- १) अशोक भवरलाल सिया वय(२७) वर्षे

२) मुकेश कुवरलाल विष्णोई वय (१८) वर्षे दोन्ही राहणार मदनवाडी चौक ता. इंदापुर जि पुणे मुळ रा.वाडी ता.फालूदी जि.जोधपुर राज्य राजस्थान यांना अटक केली आहे.

सदरचा गुन्हा हा दि. २९/११/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजनेचे सुमारास अजली इण्डेन गॅस एजन्सी गोडाउन च्या आवारात मौजे मदनवाडी ता इंदापुर जि. पुणे येथे घडला असून,

१)१,४१०००, रु किमतीच्या घर-गुती वापराच्या एकून ४७ इण्डेन गँसच्या टाक्या प्रत्येकी अंदाजे बजन ३० किलोग्रॅम, प्रत्येकी किंमत ३०००/

१)२००/- रु. किमतीच्या गॅस ट्रान्सफर करण्यासाठी वापरण्यात येणा-या लोखंडी नळ्या दोन नग त्याची प्रत्येकी किंमत १०० रुपये

२)२०/- एक लोखड़ी दाभण जुवा.कि.अ

३)२,००,०००/- एक पांढया रंगाची महिंद्रा बोलेरो कंपनीची पिकअप क.चक १२ ऋऊ १५९२.

४) २,००,०००/- एक पांढया रंगाची महिंद्रा बोलेरो कपनीची पिकअप के चक ४२ इऋ ३४५८.

५) २,००,०००/- एक पाढ-या रंगाची महिंद्रा बोलेरो कंपनीची पिकअप क्र. चक ४२ इऋ ३४५९. एकुण ७,११,२२०/ रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. संबंधित फिर्याद दाखल अंमलदार-पो.स.ई.जर्दे यांनी दाखल केली असून सदरच्या गुन्ह्याचा तपास प्रभारी अधिकारी व सब पोलीस इन्स्पेक्टर विनोद महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार लोंढी करीत आहेत.

### मुळ मालक गुन्ह्यातुन का? वगळला...

**फिर्यादी पत्रकार रीता यादव यांच्याशी संपर्क साधला असता त्या म्हणाल्या की आम्ही मूळ मालक यांच्या नावाने फिर्याद देत असताना भिगवण पोलिसांनी मूळ मालकावर गुन्हा दाखल केला नाही. तो फक्त पर राज्यातील कामगार यांच्यावरतीच दाखल केला.**

**मग मूळ मालक गुन्ह्यातून का ? वगळला हा प्रश्न उपस्थित होतो आहे तर दोन लाख रुपये घेऊन मुळ मालकांची नावे वगळली आसी जोरदार चर्चा भिगवण परिसरात जोरात सुरू आहे.**

**दोन जणांवर गुन्हा दाखल**

**बनावट नोटांमुळे पशुपालक शेतकरी वर्गात मोठी खळबळ**

# पंढरपुरात पशुपालक शेतकऱ्यांची फसवणूक दहा लाख रुपयांच्या खोट्या नोटा जप्त



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/ प्रतिनिधी : पशुप-ालक शेतकऱ्यांची फसवणूक दहा लाख रुपयांच्या खोट्या नोटा. गोठ्यासाठी शासनाचे अनुदान मिळवून देतो असे सांगून याबाबतचे अधिकृत प्रकरण न करता स्वतः त्यांच्याकडील दहा लाख १४ हजार पाचशे रुपयांचा पाचशे रुपये किमती असलेले २०२९ नोट दिले आहेत. ही घटना शुक्रवारी दुपारी इजबॉईटी घेतली आहे. याप्रकरणी दोघांवर भारतीय न्याय संहिता कलम १७८,१७९,१८०,३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अतुल भारत चौरे (रा. करकम) राजू विश्वनाथ चोरमले (रा. बार्डी) तालुका पंढरपूर जिल्हा सोलापूर यांनी संगणमत करून मधुकर दिगंबर माने वय २२ राहणार निमगाव तालुका माढा यास गाई गोठ्यासाठी शासनाने बारा लाख रुपये अनुदान मिळवून देतो असे सांगितले.

मधुकर दिव्याप्रमाणे यांच्याकडून दोघांनी वेळोवेळी काम मंजूर करण्यासाठी दोन ते तीन लाख रुपये घेतले माने यास पाचशे रुपये दराच्या २०१९ बनावट नोटा एकूण दहा लाख रुपये १४,५०० दिले व दोघांपर्यंत साहेब पोलीस निरीक्षक श्रीकांत दुवरकर यांनी पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे पुढील तपास साहेब पोलीस भारत वाघे करत आहेत अशा प्रकारे फसवणूक होत असल्याने पंढरपूर येथे पशुपालक शेतकरी वर्गात मोठी खळबळ उडाली आहे.




**६ डिसेंबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आला असून सचिन दादा बरगले व त्यांचे कार्यकर्त्यासह सहभाग घेऊन कार्यक्रम संपन्न झाला.**

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

सोमवार दि. ९ डिसेंबर २०२४


## थोडक्यात...

### जगज्जेतेपदाच्या दिशेने गुकेशचे पाऊल; ११व्या डावात डिंगवर मात

सिंगापूर : भारतीय आव्हानवीर दोम्माराजू गुकेशने बुद्धिबळाच्या इतिहासातील सर्वांत युवा जगज्जेता बनण्याच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे. गेले सलग सात डाव बरोबरीत सुटल्यानंतर अखेर गुकेशच्या प्रयत्नांना यश आले आणि त्याने जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ लढतीच्या रविवारी झालेल्या ११व्या डावात विद्यमान जगज्जेत्या चीनच्या डिंग लिरेनवर मात केली. जगज्जेतेपदाच्या लढतीत आता केवळ तीन डाव शिल्लक असून गुकेशने प्रथमच आघाडी मिळवली आहे. गुणांच्या बाबतीत गुकेश आता ६-५ असा पुढे आहे. तो जेतेपदापासून केवळ १.५ गुण दूर असल्याने उर्वरित तीनही डावांत त्याला बरोबरी पुरेशी ठरणार आहे. आतापर्यंत सर्वच डावांत बचावात्मक खेळ करणाऱ्या डिंगला तीनपैकी किमान एक डाव जिंकावा लागणार आहे. डिंगसाठी सकारात्मक बाब म्हणजे त्याने गेल्या जगज्जेतेपदाच्या लढतीत इयन नेपोम्नियाशीविरुद्ध १२व्या डावात विजय मिळवला होता. त्यातच त्याला दोन वेळा पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळण्याची संधीही मिळणार आहे. याचा तो फायदा करून घेतो का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# लोकशाही व्यवस्था बळकट करण्यासाठी सगळेजण एकजुटीने प्रयत्न करू : आ. सिद्धार्थ खरात

## मेहकर वकिल संघासाठी इमारतीचा प्रश्न मार्गी लावून अद्यावत लायब्ररी निर्माण करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी / राहुल साबळे : मेहकर बार असोसिएशन येथे म ेहकर लोणार मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थजी खरात यांचा सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी सत्काराला उत्तर देताना आमदार सिद्धार्थ रामभाऊ खरात म्हणाले की राजकीय सत्तेवर बसलेल्यांच्या हाती देश मजबूत आहे असे समजू नका कारण देश भयंकर अडचणीत आहे लोकशाही व्यवस्था लोकशाही संस्था ठिसूळ होत आहेत त्यांना कमकुवत करण्याचे पाप या देशात सुरू आहे म्हणून तुम्ही जरी जरी सत्तेत नसले तरी तुम्ही सत्तेपेक्षा कमी नाही असे माझे मत आहे म्हणून लोकशाही व्यवस्था लोकशाही संस्था मजबूत करण्यासाठी आपण एकसंघ प्रयत्न करू असे ठाम





मत नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांनी मेहकर न्यायालयात वकिल संघाने केलेल्या सत्कार समारंभ प्रसंगी बोलताना आपले ठाम मत मांडले.

या भव्य दिव्य सत्कार समारंभाला वकील संघाचे अध्यक्ष ॲड.निखिल मिटकरी उपाध्यक्ष ॲड. संदीप वाघमारे. सचिव ॲड. समाधान कटारे उपस्थित हो-ते. प्रमुख उपस्थितीमध्ये लक्ष्मण दादा घुमरे किशोर गारोळे, तर ॲड. अनंत वानखेडे. ॲड. आकाश घोडे ॲड. संदीप गवई. ॲड. विजय मोरे. ॲड. नवघरे ड.लांडगे व बार असोसिएशनचे सर्व सदस्य आवर्जून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. धोंडगे यांनी केले तसेच मेहकर बार संदर्भाने असलेल्या समस्यावर ॲड. मिटकरी यांनी आपले मत व्यक्त केले तसेच ॲड. अनंत वानखेडे. यांनी सुद्धा वकिलांच्या एकूण समस्या बाबत तसेच विद्यमान आमदार सिद्धार्थजी खरात यांच्या जीवनशैलीवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमांमध्ये आमदार सिद्धार्थजी खरात साहेब यांनी वकिल संघाच्या समस्या एकूण घेऊन त्यांनी केलेल्या मागण्या लवकरच पूर्णत्वास नेण्याची ग्वाही दिली भव्य दिव्य इमारत व लायब्ररी निर्माण करू असे आश्वासन दिले व सरते शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ड वाघमारे यांनी केले कार्यक्रमाला महिला वकील.

तसेच जूनियर व सीनियर विधीज्ञ यांच्या उपस्थितीमध्ये मेहकर बार असोसिएशनचे सर्व सदस्य यांनी विद्यमान आमदार सिद्धार्थजी खरात यांचा सत्कार केला.

तर न्यायालयायातील कारकून असोसिएशनचे अध्यक्ष. उपाध्यक्ष. सचिव. यांनी विद्यमान आमदार सिद्धार्थजी खरात यांना शारंगधर बालाजी यांची प्रतिमा भेट दिली दिली राष्ट्रगीताने कार्यक्रमाचे सांगता झाली.

# संविधान जागृतीसाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा : मारुती बनसोडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : संविधानला ७५ वर्ष पूर्ण झाले असून या संविधनावर आपला देश चालतो तरी हे संविधान प्रत्येकाच्या हक्काची व जबाबदारीची जाणीव करुन देणारे आहे या संविधनामुळे आज आपण सुरक्षित आहोत याची जाणीव जागृती विद्यार्थ्यानी करावी असे आव-ाहन परिवर्तन सामाजिक संस्थेचे संस्थापक सचिव मारुती बनसोडे यांनी केले आहे.

दिनांक ६ डिसेंबर २०२४ रोजी जि.प.प्रशाला नळदुर्ग येथे भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ' महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. महापरिनिर्वाण दिन तथा घर घर संविधान अंतर्गत प्रशालेत म ारुती बनसोडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात होते.यावेळी ते बोलत होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक इनामदार सर होते.तर घर घर संविधान अंतर्गत प्रमुख व्याख्याता म्हणून नळदुर्ग परिसरातील परिवर्तन सामाजिक संस्था सचिव तथा अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारिणी सदस्य मारुती बनसोडे उप-स्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती सय्यद मॅडम यांनी केले तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय श्रीमती पुदाले मॅडम यांनी करून दिला. व सर्वांचे आभार श्री जाधव सर मानले. सूत्रसंचलन श्रीमती दुगम मॅडम यांनी केले.

याप्रसंगी शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. इनामदार सर, श्री. कदम सर, श्री. जाधव सर, श्री. शफी सर, श्री. जागिरदार सर , श्रीमती सय्यद मॅडम, कुलकर्णी मॅडम, पुदाले मॅडम, मैंदर्गी मॅडम, मदारसे मॅडम, दुगम मॅडम, नागणे मॅडम व श्री. युसुफ शेख हे उपस्थित होते

# सर्वाधीश किंकर विठ्ठल रामानुज महाराज यांनी घेतले श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अखिल भारत जयगुरू संप्रदायाचे सर्वाधीश किंकर विठ्ठल रामानुज महाराज, कलकत्ता यांनी दि. ०७ डिसेंबर रोजी श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी त्यांचा मंदिर समितीच्या वतीने संत तुकाराम भवन येथे मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी श्रींची मुर्ती व उपरणे देऊन सन्मान केला.





किंकर विठ्ठल रामानुज महाराज श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे निस्सिम भक्त आहेत. त्यांना अलौकिक मधुर आ-वाजाचे वरदान लाभले आहे. महाराजांच्या सत्संगाचा लाभ घेतलेल्या असंख्य साधकांचा हाच अनुभव आहे. त्यांनी आपल्या संगीत प्रविणतेचा उपयोग करून भगवान नाम अनेक रागांमध्ये विणले आहे. अतिशय मधुर स्वरांची हे सृजन म्हणजे अतिशय अद्भुत आणि अमूल्य ठेवा आहे, ज्याचे श्रवण केल्यावर श्रोते भगवान नामाकडे आकर्षित होतात; लोकांना नामाबद्दल आत्मीयता प्राप्त होते, तर अनेक साधकांना 'अमृताहुनी गोड नाम तुझे देवा...' ही रचना अनुभवायला मिळते आणि त्यांची आध्यात्मिक प्रगती व्यापक आणि गतिमान होते. चित्त का नित्य महोत्सव ग्रंथ व 'तणावमुक्त व्हा' या पुस्तकाचे लेखन करून, सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या अनेक समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करून वाचकाला अध्यात्म, गुरू आणि देव इत्यादींची ओळख अगदी सोप्या पद्धतीने करून देत आहेत. तसेच त्यांनी 'सहजक्रिया योग' नावाची अतिशय सोपी पण प्रभावी योग पद्धत विकसित केली असून, या पद्धतीमध्ये प्राणायाम, प्रणाम आणि मंत्रजप यांचा अतिशय प्रभावी मिलाफ आहे. त्यांना अखिल भारत जय गुरु संप्रदायाचे तिसरे 'सर्वाधिश' म्हणून नाव देण्यात आले असून, त्यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली भारतात कार्यरत असलेल्या पंच्याहत्तरहून अधिक धार्मिक केंद्रांमध्ये आश्रमाची काळजी, 'नाम' शिकवणे, सनातन धर्माचा प्रचार, भजन, कीर्तन इत्यादी कार्यक्रम मोठ्या प्रेमाने आयोजित केले जातात, असा त्यांचा परिचय आहे.

यावेळी रामानुज महाराज यांनी मंदिर समितीला ५१ हजार रूपये इतकी धनादेश स्वरूपात देणगी दिली आहे. तसेच त्यांनी श्री संत तुकाराम भवन येथे भजन देखील केले असून, त्यांच्या वतीने व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांना शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला व सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांचा देखील सन्मान व्यवस्थापक यांनी स्वीकारला. याशिवाय, ज्ञानेश्वर कुलकर्णी, पांडूरंग बुरांडे, भिमाशंकर सारवाडकर, राजेश पिटले, चंद्रकांत कोळी, प्रसाद दशपुत्रे, राजकुमार कुलकर्णी, सुधाकर घोडके, विशाल देवकुळे, सुशिलकुमार ढेकळे पाटील या कर्मचा-यांचा देखील सन्मान केला. यावेळी मंदिर समितीचे कर्मचारी व रामानुज महाराज यांचा भक्तगण उपस्थित होता, असे मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगीतले.



# शैक्षणिक साहित्य वाटप करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : भिवंडी तालुक्यातील बाबा ग्रुप फाउंडेशन संस्थेच्या वतीने शैक्षणिक साहित्य वाटप करून केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अनोखे अभिवादन करण्यात आले.

शैक्षणिक चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबा ग्रुप फाउंडेशन संस्थेच्या वतीने पारस बाल भवन येथे आश्रम शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अनोखे अभिवादन करण्यात आले.

यावेळी बाबा ग्रुप फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अनिकेत जाधव, खजिनदार हरेश जाधव, सदस्य विकास धनगर, आकाश गायकवाड , ऋतिक जाधव, आदित्य जाधव उपस्थित होते.

# निफाड एज्युकेशन व सोशल फाउंडेशनच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड एज्युकेशन आणि सोशल फाउंडेशन च्या वतीने श्री संत जनार्दन स्वामी विद्यालय (गुरुकुल )खेडे तालुका निफाड येथे शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

निफाड एज्युकेशन व सोशल फाउंडेशन च्या वतीने नेहमीच सामाजिक उपक्रम राबविले जात असून तळ-ागाळातील गोरगरीब शालेय विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी तत्पर असतात. यावेळीही त्यांनी श्री संत जनार्दन स्वामी गुरुकुल मधील विद्यार्थ्यांना फाउंडेशनचे सदस्य किरण पानगव्हाणे यांचे जन्मदिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना वही, पेन ,पॅड, मिठाईचे वाटप करण्यात आले, असून यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी अधिक वाढेल व विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वा-तावरण निर्माण होण्यास मदत होईल

फाउंडेशनच्या संचालकांनी विद्यार्थ्यांना भविष्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या असून याप्रसंगी गुरुकुलचे ब्र.कमलानंद गिरीजी म हाराज मुख्या, शेळके पानगव्हाणे ,सानप ,देवरे ,सोनजे, जगताप ,तसेच निफाड एज्युकेशन फाउंडेशनचे सर्व संचालक, शिक्षक उपस्थित होते ,

भविष्यातही फाउंडेशनच्या वतीने अशा प्रकारचे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना आवश्यक अशी जी मदत करता येईल ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करू, विद्यार्थ्यांच्या विकासाला प्राधान्य देत त्यांच्या उज्वल भविष्यासाठी प्रयत्नशील राहू अशी माहिती फाउंडेशनचे संस्थापक उल्हास पाटील व अध्यक्ष दिगंबर नामदेव पाटील यांनी दिली

> **निफाड एज्युकेशन आणि सोशल फाउंडेशनच्या उपक्रमा अंतर्गत माझ्या जन्मदिनानिमित्त आपली आनंदाची भावना सामायिक करत, आपणही समाजाला काहीतरी देणे लागतो ही मनात भावना ठेवून शालेय विद्यार्थ्यांना जी मदत करण्यात आली ती माझ्यासाठी खारीचा वाटा म्हणून आजच्या दिवशी आनंदाची व भाग्याची गोष्ट आहे, अशीच मदत आपणही करत राहाल ही अपेक्षा**
> **– किरण पानगव्हाणे (फाउंडेशन सदस्य)**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणदिनी अभिवादन**

**एस.के.गायकवाड यांचे प्रतिपादन**

# भारतीय संविधानामुळेच देशातील नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मिळाला हक्क

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी /प्रतिनिधी : भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्य घटनेमुळे देशातील प्रत्येकाना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क मिळाला असून प्रत्येकांच्या घरी भारतीय संविधान ग्रंथ आसने ही काळाची गरज आहे.तेंव्हा विद्यार्थ्यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून उच्च शिक्षण पूर्ण करून प्रशास-नातील अधिकारी होऊन शासनकर्ती जमात बनण्याचा प्रयत्न करावे हीच खऱ्या अर्थाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली ठरेल असे प्रतिपादन आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते रिपाइं (आठवले) चे जिल्हा समन्वयक तथा पत्रकार एस.के.गायकवाड यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वसंत नळदुर्ग ता.तुळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.



दि.६ डिसेंबर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जि.प.प्राथमिक शाळा वसंत नगर नळदुर्ग येथे अभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात होते.या वेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक विकास कुलकर्णी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून एस.के. गायकवाड हे होते. प्रारंभी उपस्थित म ान्यवरांच्या हस्ते भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी शालेय विद्यार्थ्यांची भाषणे झाली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन सहशिक्षक दयानंद सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन सहशिक्षक अविनाश राठोड यांनी केले.

यावेळी सहशिक्षक हरीदास सुरवसे, श्रीकृष्ण कुलकर्णी, सहशिक्षका व्ही. एल.वाघमारे, नेहा कुंभलकर, युवा केंद्र कार्यकर्ती आर.एस.राठोड सह विद्यार्थी उपस्थित होते.